!! श्री !!

शिवसेना

# खासदार चंद्रकांत खैरे

शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ४६३ २२-२-२०१६

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

## प्रतिक्रिया

# विकासाचा दृष्टीकोन असलेल्या अर्थसंकल्पात आश्वासनाची पूर्तता व्हावी.

## सर्व समावेशक अर्थ संकल्पात अपंग, ज्येष्ठ नागरिक व महिला सुरक्षेला प्राधान्य

रेल्वेमंत्री सुरेश प्रभु यांनी मांडलेल्या रेल्वे अर्थसंकल्प सर्वसामान्यांना धीर देणारा आहे. परंतु मराठवाड्याची जी सातत्याने रेल्वे विकासाची मागणी आहे. त्यामध्ये येणाऱ्या काळात गती देण्याची आवश्यकता आहे. संभाजीनगर सह मराठवाड्यातील पर्यटन स्थळे मुख्य रेल्वेस्थानके, नवीन रेल्वेमार्ग, रेल्वे उड्डाणपुल यांच्या मंजुर कामांना त्वरीत निधी देऊन मराठवाड्याला न्याय देण्याची अपेक्षा सामान्य नागरिकांकडून होत आहे.

प्रवाशी भाड्यात न झालेली वाढ, अपगांना आरक्षण, नवीन रेल्वे, नवनवीन प्रकल्प यामुळे सर्वसामान्यांना दिलासा मिळणार आहे. मुंबईसाठी चांगल्या तरतुदी झाला असुन चर्चगेट ते विरारपर्यंत एलिवेटेड ट्रेन सुय होणार असुन, वायफाय सारख्या अत्याधुनिक सुविधा रेल्वे स्टेशनवर उपलब्ध होणार आहे. दिल्लीमध्ये रिंगरोड, पुर्नजिवित करणे. चार नवीन रेल्वे, उदय एक्सप्रेस, डबल डेकर रेल्वे, तेजस, अंत्योदय यासारख्या रेल्वे सुरु होणार आहे.

महाराष्ट्रासह मराठवाड्यात दिलेल्या प्रकल्पांना त्वरीत पूर्ण करण्यांत यावे. संभाजीनगर दिल्ली-संभाजीनगर आणि संभाजीनगर मुंबई संभाजीनगर ह्या नवीन रेल्वे सुरु करण्यासाठी सकारात्मक हालचाली सुरु आहे. कोकण रेल्वेसाठी सारथी सेवा, रेल्वे सुरक्षेसाठी विशेष लक्ष, विदेशी तंत्रज्ञानाचा वापर करुन झिरो रेल्वे बनविणे, अपघात टाळणे, तीर्थक्षेत्रासाठी आस्था ट्रेन, रेल्वेच्या मोकळया जागाचा सदुपयोग, अशा विविध निर्णयामुळे राष्ट्रहिताचा व प्रादेशिक समतोल साधणारा अर्थसंकल्प सादर झाला.

संभाजीनगर रेल्वे स्थानकांसाठी नुतनीकरणासाठी १ कोटीपेक्षा जास्त निधी. संभाजीनगर व नांदेड पर्यटन स्थळांसाठी विशेष निधिची तरतुद यामुळे समाधानकारक अर्थसंकल्प मांडला गेला.

**खासदार चंद्रकांत खैरे**

शिवसेना उपनेते

९४२२२०२५२५